MANAGING COMMITTEE
2023-2025

PRESIDENT
Domnic Romell

IMMEDIATE PAST PRESIDENT
Boman Irani

PRESIDENT-ELECT
Ajay Ashar

STRATEGIC ADVISOR
Abhishek Lodha

SENIOR VICE PRESIDENTS
Parag Shah
Jayesh Shah
Sukhraj Nahar
Sandeep Raheja
Rasesh Kanakia

VICE PRESIDENTS
Bandish Ajmera
Shailesh Puranik
Pritam Chivukula
Amit Thacker
Jackbastian Nazareth

SECRETARY
Dhaval Ajmera

TREASURER
Nikunj Sanghavi

JOINT SECRETARIES
Tejas Vyas
Pratik Patel
Sunny Bijlani
Rushi Mehta

JOINT TREASURER
Gurminder Singh Seera

COMMITTEE MEMBERS
Shahid Balwa
Subodh Runwal
Parag Munot
Nainesh Shah
Mukesh Patel
Munish Doshi
Raajesh Prajapati
Shailesh Sanghvi
Parth Mehta
Harmohan Sahni
Jayvardhan Goenka
Umang Kuwadia
Prashant Khandelwal
Binitha Dalal
Ayushi Ashar
Samyag Shah
Ricardo Romell

SPECIAL ADVISORS
Ar. Hafeez Contractor
Adv. Parimal Shroff
Anuj Puri

STATISTICS AND RESEARCH
Dr. Adv. Harshul Savla

INVITEE MEMBERS
Rahul Sagar
Ramkrishna Raheja
Nishant Agarwal
Harsh Hiranandani
Ajay Nahar
Azim F. Tapia
Cherag Ramakrishnan
Vijay Lakhani
Jayesh Chauhan
Aditya Shah
Shraddha Goradia
Sudhanshu Agarwal
Hussain Lalani
Sahil Parikh
Aditya Mirchandani
Rushi Ajmera

YOUTHWING CONVENOR
Naman Shah

PROCUREMENT CONVENOR
Nimish Ajmera

WOMEN'S WING CHAIRPERSON
Sejal Goradia

CREDAI-MCHI

आज प्राप्त झाले
26 JUN 2023
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

Ref. No. MCHI/PRES/23-25/062
Date : 23/6/2023

To,
**Shri Satish Lokhande (I.A.S.)**
Chief Executive Officer,
Slum Rehabilitation Authority,
Anant Kanekar Marg,
Bandra, Mumbai.

**Sub: Formulation of terms and conditions for allotment of permanent alternate accommodation on payment of cost of Rs 2,50,000/- as per Government Resolution bearing Misc.-2022/Q.no 54 (Part-1)/Jopsu-1 dated 25th May 2023.**

**Re: Department of Housing, Government Decision no JOPUDHO-0810/P.No.96/2018/ZOPSU-1 dated 16th May 2018.**

Dear Sir,

The Government of Maharashtra, Housing Department has come up with a landmark decision wherein in the interest of slum dwellers and to ensure that the burden of owning a house for the financially challenged people is reduced, they have standardised the amount to be paid by "Shashulk Patra" i.e. people who are residing in slums which have been constructed after the year 2000 but before the year 2011, at Rs 2,50,000/-.

It may be noted that the aforesaid Government resolution dated 2018 provided eligibility to slum dwellers who were residing in slum structures constructed between 2000-2011, to receive permanent alternate accommodation by charging cost of construction from them. As per the said Resolution, the CEO SRA was entrusted with the responsibility to evaluate the cost of construction on a scheme to scheme basis after going through the cost sheet of the project. This created practical difficulties as every scheme had its own peculiar cost elements. Furthermore, in most cases the average cost was higher than Rs. 10,00,000/- which made it impossible for the slum dwellers to afford the same. That said on the basis of the very same resolution the competent Authority was approving eligibility as per the said guidelines. This created a situation wherein slum dwellers were becoming eligible but were unable to ultimately get their homes due to the above issues.

With the standardisation of the cost, the dream homes for thousands of slum dwellers has come within their grasp. We humbly request you to formulate the terms and conditions in relation to the same.

We would like to give some suggestions with respect to the procedure which is as follows:

1) The eligibility is decided by the competent Authority as per GR of 2018 by mentioning "Shashulk Patra"

2) When the building is complete and the lottery draw is to be undertaken, the draw should be conducted for all eligible slum dwellers including shashulk Patra.

**Maharashtra Chamber of Housing Industry**
Maker Bhavan II, 4th Floor, 18, V. Thackersey Marg, New Marine Lines, Mumbai - 400 020.
Tel: 42121421, Fax: 4212 1411/407 Email: secretariat@mchi.net Website: www.mchi.net

CREDAI-MCHI CHAPTERS : THANE | KALYAN-DOMBIVLI | MIRA BHAYANDAR | RAIGAD | NAVI MUMBAI | BHIWANDI | PALGHAR BOISAR | SHAHAPUR-MURBAD | URAN-DRONAGIRI | VASAI VIRAR | ALIBAG | KARJAT-KHALAPUR-KHOPOLI | YOUTH NMR

CREDAI-MCHI

3) Subsequent to the lottery, the Developer to deposit the keys of the flats allotted to shashulk patra persons, with AR(SRA).

4) AR(SRA) to give keys to the shashulk patra slum dwellers after ensuring that the Rs 2,50,000/-

We humbly request you to formulate the terms and conditions at the earliest and procure the approval of the government for the same to ensure that allotment of the permanent alternate accommodation to the shashulk patra persons becomes a hassle free and seamless process.

Thanking you,

Yours sincerely,
For **CREDAI-MCHI**

**Domnic Romell**
**President**

**Dhaval Ajmera**
Hon. Secretary

**झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सशुल्क पुनर्वसन सदनिकांचे शुल्क निश्चित करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## गृहनिर्माण विभाग

**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५४(भाग-१)/झोपसु-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- २५ मे, २०२३.

**वाचा** :-

गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय, क्रमांक-झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१, दि.१६ मे, २०१८

**प्रस्तावना :-**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत दि.०१.०१.२००० पासून दि.०१.०१.२०११ पर्यंत अस्तित्वात असलेल्या झोपडीच्या संदर्भात अशा झोपडीत प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीधारकांचे सशुल्क पुनर्वसन करण्याचे धोरण शासनाने दि.१६ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्विकारले आहे. त्यानुषंगाने सशुल्क पुनर्वसन योग्य झोपडीधारकांच्या पुनर्वसन सदनिकेचे शुल्क निश्चित करण्यासाठी मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारसीस मा.मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सशुल्क पुनर्वसन सदनिकेचे शुल्क निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

गृहनिर्माण विभागाच्या दि.१६ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सशुल्क पुनर्वसन योग्य झोपडीधारकांच्या पुनर्वसन सदनिकेची किंमत रु.२.५ लाख इतकी निश्चित करण्यात येत आहे.

यासंदर्भात आवश्यक अटी व शर्ती मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी शासनाच्या पूर्वमान्यतेने निश्चित कराव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३०५२५१३२०००९५०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TUMBARE SUNIL BABURAO

**(सु.बा.तुंबारे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई- ३२.
३. मा.उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
७. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
८. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.), मुंबई
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, अनंत काणेकरमार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई-५१.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
१३. निवड नस्ती/ झोपसु-१.

झोपडी दि.१.१.२०११ अथवा त्यापूर्वीपासूनची सशुल्क पुनर्वसन योग्य असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीवासियाचा निवारा निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
**गृहनिर्माण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक - झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- १६ मे, २०१८.

**वाचा** :- (१) शासन निर्णय गृहनिर्माण विभाग क्र.गवसु/१२२०/प्र.क्र.२०४(१)/झोपसु-१, दि. ११ जुलै, २००१
(२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रसुध्दा-१६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ, दि. ९ मार्च, २०१५
(३) शासन निर्णय गृहनिर्माण विभाग क्र.झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१, दि. १६ मे, २०१५
(४) शासन निर्णय गृहनिर्माण विभाग क्र. प्रआयो.२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२(सेल) दि. ९ डिसेंबर, २०१५

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा,निर्मूलन व पुनर्वसन) अधिनियम, १९७१ मधील तरतुदीनुसार दि.१.१.२००० हा संरक्षणपात्र दिनांक विचारात घेवून संरक्षणपात्र झोपडीचे अस्तित्व व त्यात राहणाऱ्या झोपडीधारकांचे अस्तित्व सिध्द करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय संदर्भाधिन दि.१६ मे, २०१५ नुसार कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाने नागरी भागाकरीता -- सन २०२२ पर्यंत सर्वासाठी घरे ‟ या अभियानाअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना सुरु केली असून राज्य शासनाने संदर्भाधिन दि.९.१२.२०१५ नुसार केंद्र शासनाच्या सदर योजनेचा अंगिकार केलेला आहे. राज्य शासनाने दि.१.१.२०११ रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या परंतु शासन निर्णय दि.१६ मे, २०१५ नुसार संरक्षणपात्र ठरत नसलेल्या झोपडपट्टी क्षेत्रातील झोपड्यांच्या संदर्भात अशा झोपडीतील प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीधारकांचे सशुल्क पुनर्वसन करण्याचे धोरण स्विकारले आहे. या धोरणानुसार दि.१.१.२०११ रोजी अथवा त्यापूर्वी पासून झोपडीचे अस्तित्व व त्यात प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीधारकांचे अस्तित्व निश्चित करुन अशा झोपडीवासियाचा निवारा निश्चित करण्याच्या संदर्भात कार्यपध्दती विहित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय :-**

**१.** सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे ‟ या अभियानाअंतर्गत राज्यातील नागरी क्षेत्रासाठी दि.१.१.२००० हा संरक्षण पात्रता दिनांक विचारात घेवून संरक्षणपात्र ठरत असलेल्या झोपडीधारकाबरोबरच दि.१.१.२००० नंतर परंतु दि.१.१.२०११ रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या झोपडीच्या संदर्भात अशा झोपडीतील प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीधारकाचे सशुल्क पुनर्वसन केले जाईल. अशा झोपडीधारकास संबंधित महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद क्षेत्रात परवडणाऱ्या किंमतीत अशा झोपडीच्या बदल्यात पुनर्वसन सदनिका उपलब्ध करुन दिली जाईल.

**(अ)** संरक्षणपात्र दिनांक १.१.२००० नंतर, परंतु , सशुल्क पुनर्वसन योग्य दि.१.१.२०११ पूर्वी झोपडी अस्तित्वात होती किंवा कसे हे ठरविण्याकरीता सोबतच्या विवरणपत्रातील कोणताही किमान एक अनिवार्य
पुरावा आवश्यक राहील.

**(ब)** झोपडी दि.१.१.२०११ अथवा त्यापूर्वीपासून अस्तित्वात असल्याचे निश्चित झाल्यावर दि.१.१.२०११ रोजी त्यात राहणारा झोपडीवासिय सध्या त्यात राहात असल्याचे निश्चित करण्यासाठी

त्याच्या नावाचा व त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणाऱ्या पत्त्याचा उल्लेख असलेला, विवरणपत्रातील अलिकडच्या एक वर्षातील कोणताही किमान एक अनिवार्य पुरावा आवश्यक राहील.**(जोडपत्र एक व जोडपत्र ३ व ३अ)**

**(क)** झोपडीचे दि.१.१.२०११ अथवा त्यापूर्वीचे अस्तीत्व असल्याचे निश्चित झाल्यावर मात्र अशा झोपडीत दि.१.१.२०११ पूर्वीचा झोपडीधारक राहात असल्याचे पुरावे नसल्यास, अशा सशुल्क पुनर्वसनयोग्य झोपडीत दि.१.१.२०११ नंतरच्या दिनांकापासून सध्या राहात असलेल्या झोपडीवासियाने स्व:ताचा निवारा निश्चित होण्याकरीता उपरोक्त विवरण पत्रातील अलिकडच्या एक वर्षातील कोणताही किमान एक अनिवार्य पुरावा सादर करणे आवश्यक राहील. तसेच इतरही पुरावे सादर करणे आवश्यक राहील. .**(जोडपत्र दोन व जोडपत्र ४ व ४अ)**

२. झोपडीवासियाने सध्याही तो त्याच झोपडीत राहात आहे यासंदर्भात तसेच त्याचे नांव व त्याचे/तिचे पतीचे/पत्नीचे नावे अथवा १८ वर्षाखालील मुलाच्या नावे संबंधित महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद क्षेत्रात अन्य झोपडी/घर/सदनिका मालकी तत्वावर अथवा भाडेतत्वावर नसल्याचे स्वयंघोषणापत्र संदर्भाधिन शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि. ९ मार्च, २०१५ नुसार विहित केल्याप्रमाणे (सोबत प्रपत्र अ व ब) साध्या कागदावर भरुन देणे आवश्यक राहील. स्वयंघोषणापत्रात नमूद केल्याप्रमाणे झोपडीवासियाने अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती अथवा त्यासोबत दिलेली कोणतीही कागदपत्रे चुकीची दिल्याचे आढळून आल्यास असा झोपडीवासिय पुनर्वसनासाठी अयोग्य ठरविण्यात येईल व पुनर्वसनाशिवाय निष्कासनास पात्र असेल, त्याशिवाय त्या व्यक्तीविरुध्द योग्य ती फौजदारी कारवाई करण्यात येईल.

३. सशुल्क पुनर्वसन योग्य ठरण्यासाठी झोपडीवासियाने करावयाचा अर्जाचा नमूना वरील **(ब)** अथवा **(क)** प्रमाणे विवरणपत्रात विहित केलेल्या पुराव्यासह व स्वयंघोषणापत्रासह संबंधित अधिसूचित सक्षम प्राधिकाऱ्यांकडे करणे आवश्यक राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई/ठाणे/ पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र यांनी प्राधिकरणाच्या वेबसाईटवर सदर अर्जाचे नमूने व स्वयंघोषणापत्राचे नमूने उपलब्ध करुन द्यावेत.

४. बृहन्मुंबई,ठाणे, पुणे-पिंपरी चिंचवड क्षेत्र या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील सध्या मंजूर असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये संरक्षणपात्र न ठरलेल्या झोपडपट्टीवासियांने देखिल वरील जोडपत्रातील नमून्यात संबंधित अधिसूचित सक्षम प्राधिकाऱ्यांकडे अर्ज करणे आवश्यक राहील. सध्या मंजूर असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अशा झोपडीधारकाची झोपडी निष्कासित झालेली असल्यास, अशा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संदर्भात संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या परिशिष्ट-२ मध्ये झोपडीधारकाचा समावेश असल्यास असा असंरक्षित झोपडीधारक सशुल्क पुनर्वसनासाठी योग्य राहील.

खालील प्रकारचे असंरक्षित झोपडीधारक सशुल्क पुनर्वसनासाठी योग्य समजण्यात येऊ नयेत.

**(अ)** एकाच कुटुंबाचा घटक असल्याने व अशा कुटुंबातील अन्य सदस्यास दि. १६ मे, २०१५ च्या शासन
निर्णयानुसार पात्र ठरवले असल्याने "अपात्र" ठरणारे झोपडीधारक.

**(ब)** स्वतंत्र नांवाचा पुरावा असलेला परंतु एकाच झोपडीत राहणारा कुटुंबाचा घटक नसलेला झोपडीधारक.

**(क)** स्वतंत्र झोपडी अस्तित्वात असल्याचा कोणताही स्वतंत्र पुरावा नसलेला अन्य झोपडीधारक, आणि बंद झोपडी.

सशुल्क पुनर्वसन योग्य आढळलेल्या झोपडीवासियांची स्वतंत्र यादी संबंधित अधिसूचित सक्षम प्राधिकाऱ्यांनी योग्य पुराव्यांसह प्रमाणित करुन मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे पाठविणे आवश्यक राहील. अशा झोपडीधारकास मंजूर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सामावून घेणे शक्य आहे किंवा कसे याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे करतील. मंजूर झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सशुल्क पुनर्वसन शक्य नसल्यास अशा झोपडीवासियांचे त्यांच्या निष्कासनाच्या दिनांकानुसार प्रतिक्षा यादी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी क्षेत्रवार तयार करावी व अशा झोपडीधारकाचे पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही ठिकाणी केले जाऊ शकेल.

५. झोपडपट्टीवासियाकडून प्राप्त होणारे परिपूर्ण अर्ज, कागदपत्रे/अभिलेख/ साध्या कागदवरील स्वयंघोषणापत्र व पुराव्याच्या ग्राह्यतेसाठीचे स्वयंसाक्षांकनपत्र प्राप्त झाल्यावर संबंधित अधिसूचित सक्षम प्राधिकारी यांनी त्या पुराव्यांची खालील कार्यपध्दतीनुसार संबंधित जोडपत्राखाली नमूद केल्याप्रमाणे तपासणी करुन योग्य तो निर्णय तातडीने घ्यावा.

**(अ)** झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंमलबजावणीसाठी निष्कासित झालेल्या झोपडीच्या बाबतीत उपरोक्त विहित पुराव्यांची तपासणी/पडताळणी करुन सशुल्क पुनर्वसन योग्यता ठरविताना प्रमाणित परिशिष्ट-२ च्या संदर्भाने संबंधित अधिसूचित सक्षम प्राधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

**(ब)** झोपडपट्टीवासियांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे संबंधित अधिसूसचित सक्षम प्राधिकारी कार्यालयाने प्रचलित पध्दतीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत झोपडपट्टीचे उपग्रह नकाशा उपलब्ध करुन घेवून त्या नकाशात त्या झोपडीचे ठिकाण दर्शवून त्या नकाशाची प्रत त्यांच्या कार्यालयीन अभिलेख्यात ठेवावी.

**(क)** झोपडीच्या ठिकाणी सक्षम प्राधिकाऱ्याच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जावून स्थळपाहणी करणे आवश्यक राहील.

**(ड)** झोपडीवासियाकडून वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या अर्जावर सक्षम प्राधिकाऱ्यांचा निर्णय झाल्यावर सदरहू अर्जाचे संगणकीकरण करुन अभिलेख्यांचे जतन करणे आवश्यक राहील.

**(इ)** संबंधित अधिसूचित सक्षम प्राधिकाऱ्यांच्या निर्णया विरुध्द झोपडपट्टीवासिय महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा,निर्मूलन व पुनर्वसन) अधिनियम,१९७१ च्या कलम ३५ नुसार संबंधित अधिसूचित अपिलिय प्राधिकाऱ्यांकडे अपिल दाखल करु शकेल. तसेच, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण क्षेत्रासाठी संबंधित अधिसूचित तक्रार निवारण समितीकडे द्वितीय अपिल दाखल करु शकेल. अशा प्रकारे प्रथम अपिलात अथवा द्वितीय अपिलात होणारा निर्णय झोपडपट्टीवासियावर व संबंधित अधिसूचित सक्षम प्राधिकाऱ्यावर बंधनकारक
राहील.

**(फ)** अस्तित्वात असलेल्या झोपडीच्या संदर्भात झोपडीचे अस्तित्व दि.१.१.२०११ पूर्वीचे असून त्यात राहणारा झोपडीवासिय दि.१.१.२०११ नंतरचा असल्याचे आढळल्यास व त्याचे हस्तांतरणाचे योग्य ते पुरावे आढळल्यास असा हस्तातरणपात्र झोपडीच्या संदर्भात झोपडीधारकास शासन निर्णय दि.१६ मे, २०१५ मधील तरतुदीनुसार लागू असलेले भोगवटा हस्तांतरण शुल्क संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक राहील अशी रक्कम जमा केल्यानंतरच असा झोपडीधारक सशुल्क पुनर्वसन योग्य समजण्यात येईल.

६. झोपडपट्टीवासियास पुनर्वसन सदनिका दिल्यावर त्यास शासनाच्या त्यापुढील कोणत्याही गृहनिर्मिती/ गृहबांधणी योजनेचा लाभ देणे योग्य/समर्थनीय नसल्यामुळे अशा पुनर्वसन सदनिकेचा ताबा देताना त्या झोपडीवासियाची व त्याचा/तिचा पतीचा/पत्नीच्या फोटोसह माहिती व त्या दोघांच्या आधार कार्डचा क्रमांक याची नोंद झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने त्यांच्या अभिलेख्यात करावी.

कोणत्याही परिस्थिती कोणत्याही झोपडीधारकास सशुल्क पुनर्वसन सदनिका वाटपात द्विरुक्ती होणार नाही याची खबरदारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने घ्यावी.

७. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या संदर्भात सशुल्क पुनर्वसन सदनिकेची किंमत प्रकल्पनिहाय संबधित प्रकल्पाचा खर्च विचारात घेऊन सरासरीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून निश्चित करण्यात येईल. प्रधानमंत्री आवास योजनेसह इतर योजनांच्या संदर्भात अशा पुनर्वसन सदनिकेची किंमत प्रकल्पनिहाय संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेकडून निश्चित करण्यात येईल. अशी विहीत रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी विहित केलेल्या पध्दतीनुसार सदनिका वाटप झालेल्या संबंधित लाभार्थी झोपडीधारकाने प्रदान करणे आवश्यक राहील.

८. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सशुल्क पुनर्वसन सदनिकेचे आकारमान झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या नियमावलीच्या निकषांप्रमाणे असेल. त्या व्यतिरिक्त प्रधानमंत्री आवास योजनेतील आर्थिक दृष्टया कमकुवत घटकासाठी विहित केलेल्या सदनिकेच्या आकारमानाचे निकष इतर योजनांमधील सशुल्क पुनर्वसन सदनिकांना लागू राहील.

९. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसहीत इतर कोणत्याही योजनेतील सशुल्क पुनर्वसन सदनिकेच्या प्रथम नोंदणीचे नोंदणीशुल्क प्रधानमंत्री आवास योजनेतील आर्थिक दृष्टया कमकुवत घटकासाठीच्या सदनिकेसाठी विहीत केलेल्या नोंदणी शुल्काएवढे असेल.

१०. सशुल्क पुनर्वसन सदनिकेला महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्वसन) अंधिनियम, १९७१ मधील कलम **३ ई (१)** च्या सदनिका हस्तांतरणा विषयीच्या १० वर्षे कालमर्यादेच्या तरतुदी लागू राहणार नाहीत. मात्र एक सदनिका असतांना दुसरी सदनिका प्राप्त करणे, बनावट दस्तऐवज सादर करुन सदनिका प्राप्त करणे अशा प्रकरणात लाभार्थी सदनिकाधारक कलम **३ ई (२)** नुसार निष्कासनाच्या कारवाईस पात्र ठरेल. तसेच अशा लाभार्थी झोपडीधारकाने स्वयंघोषणापत्रात नमूद केल्याप्रमाणे त्याने दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा सबंधित कायद्यानुसार झोपडीधारकावर खटला भरला जाईल व त्यानुसार असा झोपडीधारक शिक्षेस पात्र राहील. तसेच, सशुल्क पुनर्वसन सदनिका अशा झोपडीधारकाने कुटुंबातील सदस्याव्यतिरिक्त अन्य कोणास हस्तांतरित केल्यास असा झोपडीधारक लाभार्थी या योजनेसह अन्य कोणत्याही पुनर्वसन योजनेत पुन्हा सवलतीच्या दराने सदनिका मिळण्यास भविष्यात पात्र राहणार नाही.

११. सशुल्क पुनर्वसन सदनिकांचे नियमन करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात यावा.

१२. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विनाशुल्क पुनर्वसन सदनिका मिळण्यास पात्र ठरलेला झोपडीधारक त्याचा अशा सदनिकेवरील हक्क सोडून देवून सशुल्क पुनर्वसन सदनिकेच्या योजनेत सहभागी होऊ शकेल.

१३. सदर शासन निर्णय राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद/ नगर पंचायत यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रासाठी लागू राहील. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, शहर व औद्योगिक विकास महामंडळ व राज्य शासनाच्या विधीमंडळाने पारित केलेल्या कायद्याच्या आधारे स्थापन झालेल्या सर्व महामंडळाकडून राबविण्यात येत असलेल्या नागरी सुविधा अथवा पायाभूत प्रकल्पाअंतर्गत बाधित होणाऱ्या झोपडपट्टीवासियांना देखिल लागू राहील.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१७१४५६२५४४०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नांवाने.

Kishor Govind Pathade

Digitally signed by Kishor Govind Pathade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=726d2037f6079adea28b13974a86a161d6bd20/d40c09081cda096a0b4bd82a5, serialNumber=57cba7a0612a9f66d82de41da002a8575e53c67104ae2c0b0313b15b530b7544, cn=Kishor Govind Pathade
Date: 2018.05.17 14:56:32 +05'30'

**(कि.गो.पठाडे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव व सचिव
३. मा.सभापती, विधान परिषद/मा.अध्यक्ष, विधानसभा
४. मा.विरोधी पक्षनेता विधान परिषद/मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा
५. मा.सर्व विधानसभा आणि विधान परिषद सदस्य
६. मुख्य सचिवांचे सह सचिव
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
९. महाअधिवक्ता, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
१०. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव ,
११. सर्व महानगरपालिका आयुक्त,
१२. महानगर आयुक्त, मुंबई महानगर व प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई
१३. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुंबई/ पुणे-चिंचवड क्षेत्र / नागपूर / ठाणे.
१५. विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१
१६. सर्व विभागीय महसूल आयुक्त,
१७. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
१८. जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगरे जिल्हा
१९. अपर जिल्हाधिकारी(अति/निष्का) मुंबई शहर/पश्चिम उपनगर/पूर्व उपनगरे
२०. मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१
२१. गृहनिर्माण विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी
२२. निवड नस्ती (झोपसु-१)

# वि व र ण पत्र

**(शासन निर्णय, क्रमांक झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१- दिनांक- १६ मे, २०१८.)**

**दि.१.१.२०११ रोजीच्या अथवा त्यापूर्वीच्या पुराव्यात झोपडीवासियाच्या नांवासह झोपडी क्रमांकाचा उल्लेख असलेले अथवा झोपडीच्या निश्चित ठिकाणाचा (उदा. चाळ, रस्ता इत्यादि निवासी पत्ता ) उल्लेख असलेले–**

-१) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सन २०११ यावर्षी अथवा त्यापूर्वीच्या वर्षाच्या प्रकाशित झालेल्या अंतीम मतदार यादीचा प्रमाणित उतारा.

अथवा

-२ त्या झोपडीत प्राधिकृत वीज कंपनीने वीज जोडणी दिल्याची कागदपत्रे/ अभिलेख /देयक

अथवा

-३) झोपडीची महानगरपालिका/ नगरपरिषदेने मालमत्ता कर आकारणी केल्याचा पुरावा.

अथवा

-४) राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून अकृषिक परवानगी अथवा अकृषिक वापर नियमित करण्याची परवानगी व त्यावेळी भरलेल्या अकृषिक कर/अकृषिक दंडाच्या रक्कमेची पावती.

अथवा

-५) दि.१.१.२०११ किंवा त्यापूर्वी नोंदणीकृत असलेल्या झोपडपट्टी सह.गृहनिर्माण संस्थेचे सहाय्यक निबंधक, सहकार यांनी प्रमाणित केलेले भाग प्रमाणपत्र.

अथवा

-७) व्यावसायिक अथवा औद्योगिक स्वरुपाच्या वापरात असलेल्या अथवा त्यांसह निवासी वापरात असलेल्या झोपडीच्या बाबतीत त्या झोपडीच्या क्रमांकाचा उल्लेख असलेला अथवा निश्चित ठिकाण दर्शविणारा महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपरिषदेचा दि.१/१/२०११ अथवा त्यापूर्वी प्राप्त झालेला (अ) गुमास्ता परवाना/ खाणावळ किंवा (ब) उपहारगृह लायसन्स/त्या अनुषंगाने भरण्यात आलेल्या कराची पावती.

# जोडपत्र -एक

(शासन निर्णय, क्रमांक झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१- दिनांक-१६ मे, २०१८.)

दि. १.१.२०११ अथवा त्यापूर्वीपासूनच्या सशुल्क पुनर्वसन योग्य झोपडीत त्या दिनांकास राहणारा झोपडीवासिय सध्या त्यात रहात असल्याबद्दल निश्चित करण्यासाठी त्याने पुढील कागदपत्रे/अभिलेख सादर करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| (१) | झोपडी संरक्षणपात्र ठरण्याकरीता दि.१.१.२०११ रोजी अथवा त्यापूर्वीपासून अस्तित्वात असल्याबद्दलचे पुरावे आवश्यक असल्यामुळे सोबतच्या विवरणपत्रातील कोणताही किमान एक पुरावा आवश्यक आहे. |
| | आणि |
| (२) | दि.१.१.२०११ अथवा त्यापूर्वीपासूनची झोपडी सध्या तेथे अस्तित्वात असल्याबद्दल आणि झोपडीवासिय दि.१.१.२०११ अथवा त्यापूर्वीपासून सध्या त्यात प्रत्यक्ष रहात असल्याबद्दलचा पुरावा म्हणून त्याचे नांव व झोपडीचा पत्ता अथवा त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणारे सोबतच्या विवरणपत्रामधील अलीकडच्या एक वर्षातील कोणताही किमान एक पुरावा आवश्यक आहे. |
| | आणि |
| (३) | शासन आदेशातील परिच्छेद क्र.२ नुसार "स्वयं घोषणापत्र" (Self Declaration) व "स्वयं साक्षांकनासाठीचे स्वयं घोषणापत्र" (Self Declaration for Self Attestation). |
| | आणि |
| (४) | UIDAI ने दिलेल्या आधार कार्डाची स्वयंसाक्षांकित प्रत |

# जोडपत्र- दोन

(शासन निर्णय, क्रमांक झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१- दिनांक- १६ मे, २०१८.)

दि. १.१.२००० नंतरच्या परंतु सशुल्क पुनर्वसन योग्य दि. १.१.२०११ अथवा त्यापूर्वीपासूनच्या संरक्षणपात्र झोपडीत सध्या रहात असलेल्या झोपडीवासियाकडे दि.१.१.२००११ अथवा त्यापूर्वीपासून रहात असल्याचे पुरावे नसल्यास अथवा तो दि.१.१.२०११ नंतरच्या दिनांकापासून रहात असल्यास त्याने पुढील कागदपत्रे / अभिलेख सादर करणे आवश्यक आहे.

(i) झोपडीचे अस्तित्व ठरण्याकरीता दि.१.१.२०११ रोजी अथवा त्यापूर्वीपासून अस्तित्वात असल्याबद्दलचे पुरावे आवश्यक असल्यामुळे सोबतच्या विवरणपत्रातील कोणताही किमान एक पुरावा आवश्यक आहे.

आणि

(ii) दि. १.१.२०११ अथवा त्यापूर्वीपासूनची झोपडी सध्या तेथे अस्तित्वात असल्याबद्दल आणि झोपडीवासिय सध्या त्यात प्रत्यक्ष रहात असल्याबद्दलचा पुरावा म्हणून नांव व झोपडीचा पत्ता अथवा त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणारे सोबतच्या विवरणपत्रातील अलीकडच्या एक वर्षातील कोणताही किमान एक पुरावा आवश्यक आहे.

आणि

(iii) शासन आदेशातील परिच्छेद क्रमांक "२" प्रमाणे "स्वयं घोषणापत्र" (Self Declaration) व "स्वयं साक्षांकनासाठीचे स्वयं घोषणापत्र" (Self Declaration for Self Attestation)

आणि

(iv) झोपडीवासिय सध्या तेथे रहात असल्याचे अतिरिक्त पुरावे म्हणून:-

--अ) झोपडीवासियाने त्या झोपडीचा ताबा घेतल्यानंतर अलिकडच्या एक वर्षातील जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रकाशित झालेल्या अंतीम मतदार यादीचा प्रमाणित उतारा.

अथवा

--ब) त्या झोपडीवासियाने त्याच्या अपत्याच्या शासन मान्यता प्राप्त शाळेत/महाविद्यालयात नोंदविलेल्या त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणारा निवासी पत्त्याबाबतचा मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी दिलेला प्रमाणित उतारा

अथवा

--क) झोपडपट्टीवासिय नोकरीस असलेल्या नियोक्त्याने त्याच्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणाऱ्या निवासी पत्त्याबाबत दिलेले प्रमाणपत्र.

आणि

(v) झोपडीवासीय दावा करीत असलेल्या दिनांकास त्या झोपडीचा ताबा त्याच्याकडे आल्याचा पुरावा म्हणून -

(a) अगोदरच्या झोपडीवासियाचे नोटरी केलेले मुद्रांक पेपरवरील दिनांक असलेले संमतीपत्र.

अथवा

(b) झोपडपट्टीवासिय भाडे तत्वावर प्रत्यक्ष रहात असल्याबद्दल भाडेकराराच्या कागदपत्रात अथवा भाडे पावतीत त्यांची नावे व त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणाऱ्या पत्त्याचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

आणि

(vi) झोपडीचा भोगवटा हस्तांरतण झाल्याची नोंद शासकीय अभिलेखात घेण्याबद्दल ' भोगवटा हस्तांतरण शुल्क ' (Occupancy Transfer Charges) म्हणून त्या झोपडीच्या बृहन्मुंबई, ठाणे, पुणे पिंपरी-चिंचवड व नागपूर येथील संरक्षणप्राप्त निवासी झोपडीकरीता रु.४०,०००/- व व्यावसायिक अथवा औद्योगिक अथवा त्यासह निवासी वापरातील झोपडीकरीता रु,६०,०००/- प्रमाणे भरणे आवश्यक राहील. अन्य शहरातील संरक्षणपात्र झोपडीकरीता ' भोगवटा हस्तांतरण शुल्क ' (Occupancy Transfer Charges) म्हणून अनुक्रमे निवासी अथवा व्यावसायिक अथवा औद्योगिक अथवा त्यासह निवासी वापराच्या शुल्काच्या ५० टक्के इतके आकारण्यात येईल.

(ओ) झोपडीधारक मृत्यु पावलेला असल्यास त्याची पत्नी/तिचा पती यांच्या नांवे हस्तांतरित करण्यास तसेच ते दोन्ही मृत्यु पावलेले असल्यास त्यांचा मुलगा/मुलगी यांच्या नांवे ती झोपडी हस्तांतरीत करण्याकरिता 'भोगवटा हस्तांतरण शुल्क' आकारण्यांत येणार नाही.

(बी) झोपडीधारकास झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा लाभ मिळाल्यावर, अशा व्यक्तीला किंवा त्याच्या/तिच्या पत्नीला/पतीला अथवा त्यांच्या अज्ञान मुलांना झोपडी विकत अथवा हस्तांतरीत करुन घेता येणार नाही.

(सी) झोपडीचे परस्पर सहमतीने विक्री अथवा विविध टप्प्यातील साखळी द्वारे हस्तांतरण झाले असल्यास सध्या वास्तव्य करणाऱ्या रहिवासीकडून'भोगवटा हस्तांतरण शुल्क' आकारण्यात येईल. पूर्वीच्या विक्रीबाबत अथवा प्रत्येक टप्प्याचे "भोगवटा हस्तांतरण शुल्क" न आकारता केवळ सध्याच्या टप्प्यावरील ' भोगवटा हस्तांतरण शुल्क ' आकारण्यात येईल. तसेच यापुढील प्रत्येक हस्तांतरणाबाबत ' भोगवटा हस्तांतरण शुल्क ' आकारण्यात येईल.

# जोडपत्र- तीन

**( शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र.-क्रमांक झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१-दिनांक-१६मे, २०१८.मधील जोडपत्र-एक नुसार)**

**दि.१.१.२००० नंतर परंतु दि.१.१.२०११ पूर्वीपासूनच्या झोपडीत दि.१.१.२०११ अथवा त्यापूर्वीपासून राहणाऱ्या झोपडीवासियासाठी अर्ज.**

| अर्ज क्र. | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

दिनांक:- / /२०......

a. झोपडीवासियाचे नाव :- श्री/श्रीमती. ----------------------------------------

b. झोपडीपट्टीचे नाव व पत्ता :- ----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

c. शहराचे नांव :- ------------------------ d. महापालिका/नगरपालिका/वॉर्ड क्र.-------

e. झोपडीवासीय सध्याच्या झोपडीत केव्हापासून [ | | | | | | | ] रहात आहे:-

f. कुटुंबातील सदस्यांची नावे :- १.पत्नी/पती श्रीमती/श्री.------------------------

पत्नी/पतीसह फोटो

२. ----------------------------------------

३. ----------------------------------------

४. ----------------------------------------

५. ----------------------------------------

**(अधिक सदस्य असल्यास स्वतंत्र यादी स्वयंप्रमाणित करुन )**

g झोपडी दि.१.१.२०११ रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असल्याबद्दल आणि झोपडीवासिय त्यात रहात असल्याबद्दल सादर केलेला पुरावा :-
**(अ) विवरणपत्रातील सादर केलेला पुरावा/पुराव्यांचे अनुक्रमांक:-** ☐ ☐ ☐ ☐ ☐
**(अतिरिक्त पुरावे असल्यास)**

**आणि**

h **(ii) झोपडीवासिय सध्या त्या झोपडीत प्रत्यक्ष रहात असल्याबद्दलचा अलिकडच्या एका वर्षातील पुरावा.**
**(अ) विवरणपत्रातील सादर केलेल्या पुरावा/पुराव्यांचे अनुक्रमांक:-** ☐ ☐ ☐ ☐ ☐
**(अतिरिक्त पुरावे असल्यास)**

i **शासन आदेशातील परिच्छेद क्रमांक नुसार स्वत:चा फोटो असलेल्या साध्या कागदावर स्वयं घोषणापत्र व "पुरावे साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र":-** **आहे** **नाही**

j **UIDAI ने दिलेल्या आधार कार्डाची स्वयंसाक्षांकित प्रत** **आहे/ नाही**

**झोपडीवासीयाची सही/ अंगठा निशाणी :-**

**भ्रमणदूरध्वनी क्रमांक :**

**टीप :- सक्षम प्राधिकारी कार्यालयाने छायांकित प्रतीवर अर्ज प्राप्त झाल्याची पोच द्यावी.**

# जोडपत्र- तीन -"अ"

**(शासन निर्णय, क्रमांक झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१- दिनांक- १६ मे, २०१८.**

**सक्षम प्राधिकारी / सहाय्यक आयुक्त यांच्या कार्यालयीन उपयोगाकरीता**

सक्षम प्राधिकारी कार्यालयाचे नांव :-

दिनांक :- / / २०१----

---

**नगरपालिका / महानगरपालिकेचे संक्षिप्त नांव :-** | | | | | **अर्ज क्र.** | | | | | | | | |

A दिनांक १.१.२०११ रोजीच्या अथवा त्या पूर्वीचा व दिनांक १.१.२०...... मतदार यादीत उल्लेख असल्यास ( सन २०००-२०११ अ सन २०११ नंतरचा ब )

| महाराष्ट्र विधानसभा निर्वाचन क्षेत्र क्रमांक | मतदान केंद्र / यादीचा भाग क्रमांक | मतदार यादीतील क्रमांक |
|---|---|---|
| | | |
| | | |

B झोपडपट्टी जमीनीची मालकी :- (योग्य असेल त्या रकान्यात √ चिन्हांकित करावे)

| राज्य शासन | म्हाडा | नगरपालिका / महानगरपालिका | इतर राज्य शासकीय मंडळ / महामंडळ / प्राधिकरण इत्यादी. | केंद्र शासन / केंद्र शासन उपक्रम | खाजगी |
|---|---|---|---|---|---|

C

| | | |
|---|---|---|
| १ | झोपडी दि. १.१.२०११ अथवा त्यापूर्वीपासूनची असल्याचे तसेच झोपडीवासिय देखिल दि. १.१.२०११ अथवा पूर्वीपासूनचा / दिनांक १.१.२०११ नंतर वास्तव्यास आल्याबाबत सादर करण्यात आलेल्या पुराव्यांची पडताळणी केली असता–<br>अ) ते सर्व पुरावे योग्य आहेत.<br>ब) त्यातील क्र. येथील पुरावे योग्य/खरे नाहीत | |
| २ | संबंधित झोपडपट्टीच्या उपग्रह नकाशात त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविण्यात आले आहे काय? | आहे / नाही |
| ३ | झोपडपट्टी पुनर्वसन योजना सुरु असल्यास परिशिष्ट-२ मधील अर्जदाराचे नांव व यादीतील क्रमांक :- | |
| ४ | झोपडीच्या ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन स्थळ तपासणीचा दिनांक व अभिप्राय :- | _ _ _ _ २ ० १ _ अनुकुल / प्रतिकुल |

**पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे**
**नांव, पदनाम व सही**
**दिनांक :-**

**सक्षम प्राधिकाऱ्याचा " सशुल्क पुनर्वसन योजने " बाबतचा निर्णय**

दिनांक:- / /२०१----- अन्वये झोपडीवासिय यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यावर सदरहू झोपडीवासिय महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या तरतुदीनुसार तो झोपडीवासिय सशुल्क पुनर्वसनासाठी **"योग्य"** असल्याचे मी प्रमाणित करतो. / तो झोपडीवासिय सशुल्क पुनर्वसनासाठी **"नाही "** असे मी प्रमाणित करतो.

सक्षम प्राधिकारी यांचे नांव, सही व

Seal

दिनांक :

**झोपडीवासिय संरक्षणपात्र झोपडीत दि. १.१.२०११ नंतरच्या दिनांकापासून रहात असल्यास शासन आदेशाच्या परिच्छेद ५ नुसार झोपडीवासियाने भोगवटा हस्तांतरण शुल्क रक्कम भरली आहे काय ?** **आहे / नाही**

**भरली असल्यास** | | | | | | | | | **रक्कम रुपये**

**रक्कम भरल्याचा** | | | | | २ | ० | १ | | **दिनांक**

---

**छाननी अर्ज व माहितीचे संगणकीकरण करण्यांत आल्याचा दिनांक** | | | | | २ | ० | १ | |

**( )**

**संगणकीकरण केलेल्या कर्मचाऱ्याचे नांव व सही**

***************

# जोडपत्र-चार

**(शासन निर्णय, क्रमांक झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१- दिनांक- १६ मे, २०१८.)**

**दि.१.१.२०११ वा त्यापूर्वीच्या सशुल्क पुनर्वसन पात्र झोपडीत दि. १.१.२०११ नंतरच्या दिनांकापासून सध्या रहात असल्यास करावयाचा अर्ज.**

| अर्ज क्र. | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|

**( सक्षम प्राधिकाऱ्याने भरावयाचा )**
**दिनांक:- / /२०.......**

a. झोपडीवारियाचे नाव:- श्री/श्रीमती. :------------------------------------------------------------------------

b. झोपडपट्टीचे नाव व पत्ता :- ------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

c. शहराचे नांव :- ------------------------------------------------ d. महापालिका/नगरपालिका/वॉर्ड क्र.-------

e. झोपडीवासीय सध्याच्या झोपडीत केव्हापासून रहात आहे:- | | | | | | | | |

f. कुटुंबातील सदस्यांची नावे :-

पत्नी/पतीसह फोटो

१. पत्नी/पती श्रीमती/श्री.----------------------------------------

२. ------------------------------------------------------------

३. ------------------------------------------------------------

४. ------------------------------------------------------------

५. ------------------------------------------------------------

( अधिक सदस्य असल्यास स्वतंत्र यादी स्वयंसाक्षांकित करुन जोडावी. )

g झोपडी दि.१.१.२०११ रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असल्याबद्दल सादर केलेला पुरावा :-
(अ) विवरणपत्रातील सादर केलेला अनिवार्य पुरावा/पुराव्यांचे अनुक्रमांक:- ☐ ☐ ☐ ☐ ☐
**(अतिरिक्त पुरावे असल्यास)**

**आणि**

h (ii) दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनची झोपडी सध्या तेथे अस्तित्वात असल्याबद्दल आणि झोपडीवासिय सध्या त्यात प्रत्यक्ष रहात असल्याबद्दलचा विवरणपत्रातील सादर केलेला अलीकडच्या एक वर्षातील पुरावा :-

(अ) विवरणपत्रातील सादर केलेल्या पुरावा/पुराव्यांचे अनुक्रमांक:- ☐ ☐ ☐ ☐ ☐

**(अतिरिक्त पुरावे असल्यास)**

-अ) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अलिकडच्या एक वर्षातील अंतिम करण्यात आलेल्या मतदार यादीत त्याचे नांव असल्याचा प्रमाणित उतारा **आणि** — **आहे/नाही**

-ब) त्या झोडडीवासियाने त्याच्या अपत्याचा शासन मान्यता प्राप्त शाळेत/महाविद्यालयात नोंदविलेल्या त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणारा निवासी पत्त्याबाबतचा मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी दिलेला प्रमाणित उतारा — **आहे/नाही**

**आणि**

-क) झोपडीवासिय नोकरीस असलेल्या नियोक्त्याने त्याच्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणाऱ्या निवासी पत्त्याबाबत दिलेले प्रमाणपत्र. — **आहे/नाही**

**आणि**

--ड) सक्षम प्राधिकारी कार्यालयाच्या अधिकाऱ्याचा झोपडीच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन केलेला त्याच्या पत्त्याबाबतचा तपासणी अहवाल. — **आहे/नाही**

**आणि**

i शासन आदेशातील परिच्छेद क्रमांक नुसार स्वत:चा फोटो असलेल्या साध्या कागदावर स्वयं घोषणापत्र व पुरावे साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र :- **आहे / नाही**

**आणि**

j UIDAI ने दिलेल्या आधार कार्डाची स्वयंसाक्षांकित प्रत **आहे / नाही**

**आणि**

k अगोदरच्या झोपडीवासियाने दिलेले मुद्रांक पेपरवरील संमतीपत्र किंवा भाडे करार कागदपत्र

**टीप :- सक्षम प्राधिकारी कार्यालयाने छायांकित प्रतीवर अर्ज प्राप्त झाल्याची पोच द्यावी.** **झोपडीवासीयाची सही/ अंगठा निशाणी :-**
**भ्रमणदूरध्वनी क्रमांक :**

# जोडपत्र- चार "अ"

**(शासन निर्णय, क्रमांक झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१- दिनांक- १६ मे, २०१८.)**

**सक्षम प्राधिकारी / सहाय्यक आयुक्त यांच्या कार्यालयीन उपयोगाकरीता**

सक्षम प्राधिकारी कार्यालयाचे नांव :-

दिनांक :- / / २०१----

---

**नगरपालिका / महानगरपालिकेचे संक्षिप्त** ☐☐☐☐ **अर्ज क्र.** ☐☐☐☐☐☐☐☐ **नांव :-**

A दिनांक १.१.२०११ रोजीच्या अथवा त्या पुढील दिनांक १.१.२०...... मतदार यादीत उल्लेख असल्यास :- ( सन २००० ते २०११ **अ** सन २०११ नंतरचा **ब**)

| | महाराष्ट्र विधानसभा निर्वाचन क्षेत्र क्रमांक | मतदान केंद्र / यादीचा भाग क्रमांक | मतदार यादीतील क्रमांक |
|---|---|---|---|
| अ | | | |
| ब | | | |

B झोपडपट्टी जमीनीची मालकी :- (योग्य असेल त्या रकान्यात √ चिन्हांकित करावे)

| राज्य शासन | म्हाडा | नगरपालिका / महानगरपालिका | इतर राज्य शासकीय मंडळ / महामंडळ / प्राधिकरण इत्यादी. | केंद्र शासन / केंद्र शासन उपक्रम | खाजगी |
|---|---|---|---|---|---|

C

| | |
|---|---|
| १ | झोपडी दि. १.१.२०११ अथवा त्यापूर्वीपासूनची असल्याचे तसेच झोपडीवासिय देखिल दि. १.१.२०११ अथवा पूर्वीपासूनचा / दिनांक १.१.२०११ नंतर वास्तव्यास आल्याबाबत सादर करण्यात आलेल्या पुराव्यांची पडताळणी केली असता–<br>अ) ते सर्व पुरावे योग्य आहेत.<br>ब) त्यातील क्र. येथील पुरावे योग्य/खरे नाहीत |
| २ | संबंधित झोपडपट्टीच्या उपग्रह नकाशात त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविण्यात आले आहे काय? आहे / नाही |
| ३ | झोपडपट्टी पुनर्वसन योजना सुरु असल्यास परिशिष्ट-२ मधील अर्जदाराचे नांव व यादीतील क्रमांक :- ☐☐☐☐☐☐☐☐ |
| ४ | झोपडीच्या ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन स्थळ तपासणीचा दिनांक व अभिप्राय :- ☐☐☐☐ २ ० १ ☐ अनुकुल / प्रतिकुल |
| | |

**पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे**

**नांव, पदनाम व सही**

**दिनांक :-**

**सक्षम प्राधिकाऱ्याचा " सशुल्क पुनर्वसन योग्यते" बाबतचा निर्णय**

दिनांक:- / /२०१----- अन्वये झोपडीवासिय यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यावर सदरहू झोपडीवासिय महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या तरतुदीनुसार तो झोपडीवासिय सशुल्क पुनर्वसनासाठी **"योग्य"** असल्याचे मी प्रमाणित करतो. / तो झोपडीवासिय सशुल्क पुनर्वसनासाठी **"योग्य"** नाही असे मी प्रमाणित करतो.

Seal

सक्षम प्राधिकारी यांचे नांव, सही व
दिनांक :

**झोपडीवासिय सशुल्क पुनर्वसन योग्य झोपडीत दि. १.१.२०११ नंतरच्या दिनांकापासून रहात असल्यास शासन आदेशाच्या परिच्छेद ५ (फ) नुसार झोपडीवासियाने भोगवटा हस्तांतरण शुल्क रक्कम भरली आहे काय ? आहे / नाही**

**भरली असल्यास रक्कम रुपये**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**रक्कम भरल्याचा दिनांक**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २ | ० | १ | |

--------------------------------------------------------------------------------

**छाननी अर्ज व माहितीचे संगणकीकरण करण्यांत आल्याचा दिनांक**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २ | ० | १ | |

**( )**

**संगणकीकरण केलेल्या कर्मचा-याचे नांव व सही**

**************

## प्रपत्र -अ

अर्जदाराचा फोटो

**(शासन निर्णय, क्रमांक झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१- दिनांक- १६ मे, २०१८.)**

## स्वयंघोषणापत्र

मी--------------------- श्री. .....................................यांचा मुलगा/मुलगी वय .......... वर्ष, आधार क्रमांक (असल्यास)...................................व्यवसाय.............................राहणार ..........................................याद्वारे घोषित करतो/करते की, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या विचारार्थ असलेली वाणिज्यिक/निवासी किंवा दोन्ही प्रकारातील झोपडी माझ्या ताब्यात आहे तसेच माझ्या नावे आणि माझ्या पतीच्या/पत्नीच्या नावे अथवा अठरा वर्षाखालील (अज्ञान) मुलांच्या नावे या महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात अन्य झोपडी/घर /सदनिका मालकी तत्वावर अथवा भाडे तत्वावर नाही आणि ही सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :-.................................

अर्जदाराची सही :-.......................

दिनांक :-.................................

अर्जदाराचे नाव :-.......................

## Annexure- A

Applicants Photo

(G.R. No ZOPUYO-0810/C.R.93/2018/ZOPASU-1, Dated- 16 May, 2018.)

## Self Declaration

I--------------------Son/Daughter of....................................aged........... occupation....................................resident of ............................ with UID No........................................... hereby declare that present commercial/dwelling structure or both which is under consideration for Slum Rehabilitation Scheme is actually occupied by me no other hut/house/flat is standing in my name or in the name my wife/husband or in the names of my below 18 years (minor) children on ownership basis or on rental basis within the limits of Local Self Government Bodies such as Municipal Corporation/Municipality/Municipal Council Concerned. The information provided above is true and correct to the best of my personal knowledge, information belief. I fully understand the consequences of giving false information. If the information is found to be false, I shall be liable for prosecution and punishment under Indian Penal Code and/or any other law applicable thereto.

Place :-.................................  applicant°s Signature:-.......................

Date :-.................................  Applicant°s Name:-......................

## प्रपत्र -ब

अर्जदाराचा फोटो

**(शासन निर्णय, क्रमांक झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१- दिनांक- १६ मे, २०१८.)**

## स्वयं-साक्षांकनासाठी स्वयंघोषणापत्र

मी--------------------- श्री. ....................................यांचा मुलगा/मुलगी वय .......... वर्ष, आधार क्रमांक (असल्यास)...................................व्यवसाय............................राहणार ..........................................याद्वारे घोषित करतो/करते की, मी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सशुल्क पुनर्वसन योग्यता तपासण्यासाठी विहित पुराव्याच्या स्वयं साक्षांकित केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोट्या असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :-................................ अर्जदाराची सही :-......................

दिनांक :-................................. अर्जदाराचे नाव :-......................

Applicants Photo

## Annexure- B

(G.R. No .ZOPUYO-0810/C.R.93/2018/ZOPASU-1, Dated- 16 May, 2018.)

## Self Declaration for Self Attestation

I------------------------- Son/Daughter of...................................aged........... occupation....................................resident of ............................ with UID No........................................... hereby declare that the copies of prescribed proof/s for examining the eligibility for Rehabilation with cost in Slum Rehabilitation Scheme attested by me are true copies of original documents. I am well aware of the fact the if the copies are found to be false, I shall be liable for prosecution and punishment under Indian Penal Code and/or any other law applicable thereto.

Place :-................................ applicant's Signature:-.......................

Date :-................................. Applicant's Name:-.......................